स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,अंबाजोगाई, जिल्हा बीड.
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)
SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE & HOSPITAL AMBAJOGAI , DIST BEED
PH NO 02446/248438,247060 FAX – 02446/247132

No.SRTRGMCH/P.Store/ ९५५ /2021 Date - ०४/ 02/2021

# पाकशाळेतील भांडे खरेदी करण्याबाबतचे दरपत्रक सुचना

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील पाळशाळे मधील विविध प्रकारचे भांडे खरेदी करिता त्यांचे दर सहा महिण्याच्या कालावधी करिता निश्चीत करुन ठेवण्याकरिता इच्छुक पुरवठादाराकडुन दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर कालावधी दरनिश्चित पत्र निघाल्याच्या दिवसापासुन सहा महिण्या करिता राहीन.

सदर सुचने नुसार मोहरबंद दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख ११ /०२/२०२१ दुपारी ०५.०० वाजे पर्यंतची असुन दिनांक१२ /०२/२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता मा.वैद्यकिय अधिक्षक, यांचे दालनात दरपत्रके उघडण्यात येईल. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहाता येईल. दरपत्रक मा.अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, यांचे नावे रुग्णालय आवक जावक विभागात सादर करावयाचे असुन दरपत्रकाच्या लिफाफयावर पाकशाळेतील भांडे साहित्य खरेदी करिता दरपत्रक असे स्पष्ट नमुद करण्यात यावे तसेच दर हे पुरवठादाराने स्वत: चे दुकानाचे नाव नमुद करणे आवश्यक राहील. तसेच दर हे पुरवठादाराने त्याचे लेटरहेडवर दुकाणाचा शिक्का व सही सह खालील नमुण्यात त्याच नमुण्यात त्याच क्रमाने देण्यात यावे जिथे दर द्यायचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे. ती जागा रिकामी सोडण्यात येऊ नये. तसेच दरपत्रका सोबत पुरवठादाराने दुकान नोंदणी प्रमाणपत्र, ,पॅन कार्ड व जीएसटी क्रमांक प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे . तसेच दरपत्रकासोबत एकल निविदा असणे बाबत तसेच खरेदी प्राधिका-यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत "निविदाकारांची हमी" चे विहित प्रपत्र-अ सोबत जोडणे आवश्यक आहे.

सर्व दर हे दरपरिमाना करिता सर्व कर सामाविष्ट करुन नमुद करावे. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच यादी मधील काही बाबी किंवा मागविण्यात येणा-या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रदद करण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे.

दर निश्चिती झाल्यावर आवश्यकते बाब निहाय न्युनतम दर देणा-या पुरवठादाराचे नाव दर निश्चित करण्यात येईल. त्यानुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येईल आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसामध्ये वस्तुचा पुरवठा करावा लागेल. व त्याचे देयक तिन प्रतीत मा.अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, यांचे नावाने देयक सादर करावे लागेल.

| अ.क्र. | वस्तुचे नाव | क्षमता | प्रती नग | दर |
|---|---|---|---|---|
| १ | मिक्सर (फिलिप्स कंपनी) | —— | प्रति नग | |
| २ | कुकर | ४० लिटर | प्रति नग | |
| ३ | लोखंडी रॅक (मोठे) | —— | प्रति नग | |
| ४ | स्टील मग | १ लिटर | प्रति नग | |
| ५ | दांडी पात्र ( भाजी वाटपासाठी) | २ लिटर | प्रति नग | |
| ६ | भातवाढी | —— | प्रति नग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | बतई (मोठी) | --- | प्रति नग | |
| ८ | जेवणाचा टिपीन (स्टील) ४ ताळी | ---- | प्रति नग | |
| ९ | बेलने मोठे (लाकडी) | --- | प्रति नग | |

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय
वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई

प्रत
Notice Board & Website,,S.R.T.R.G.M.C.Hospital, Ambajogai.

## प्रपत्र-अ

### निविदाकरांनी द्यावयाच्या हमीपत्राचा नमुना

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिका-या बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/आम्ही/ आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.